महानगरपालिका निवडणुकांसाठी निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या नियुक्त्या करणे, त्यांच्यावर कामाची जबाबदारी सोपविणे, इत्यादिबाबत...

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/मनपा-२०११/प्र.क्र.१६/का.५.
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १२/०३/२०१५

वाचा :- राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/मनपा-२०११/प्र.क्र.१६/का.५,
दि.२१/११/२०११ व दि.०९/०२/२०१५

## आदेश

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील पंचायती व नगरपालिका यांच्या सर्व निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे.,

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाच्या उपरोक्त दि.२१/११/२०११ च्या आदेशान्वये महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या नियुक्तीबाबत तसेच इतर बाबींसाठी तरतूद करण्यात आलेली आहे. या आदेशामध्ये महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी साधारणत: ४ ते ६ प्रभागांकरिता एक याप्रमाणे निवडणूक निर्णय अधिकारी राहतील असे आदेशित करण्यात आले आहे.,

आणि ज्याअर्थी, शासनाने दिनांक ३१ डिसेंबर, २०१४ रोजी काढलेल्या अध्यादेशान्वये (सन २०१४ चा १८) महानगरपालिका व नगरपरिषद निवडणुकांकरिता बहुसदस्यीय प्रभाग पध्दती रद्द करुन एकसदस्यीय प्रभाग पध्दती लागू केली आहे.,

आणि ज्याअर्थी, महानगरपालिकेच्या निवडणुकीत एकसदस्यीय पध्दत लागू करण्यात आल्यामुळे प्रत्येक निवडणूक निर्णय अधिका-याकडे किती प्रभाग राहतील यासंदर्भातील सुधारित आदेश देणे आवश्यक झाल्यामुळे राज्य निवडणूक आयोगाच्या उपरोक्त दिनांक ०९/०२/२०१५ च्या आदेशान्वये, पूर्वीचे आयोगाचे दि.२१/११/२०११ चे आदेश रद्द करुन, महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी किती प्रभागांसाठी एक निवडणूक निर्णय अधिकारी राहील यासंदर्भात तरतूद करण्यात आली. मात्र निवडणूक निर्णय अधिकारी / सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या नियुक्त्या व त्यांनी पार पाडावयाची कामे यासंदर्भात आदेश काढण्यात आलेले नाहीत. त्यामुळे आयोगाचे उपरोक्त दि.२१/११/२०११ व दि. ०९/०२/२०१५ चे आदेश रद्द करुन नव्याने आदेश काढणे आवश्यक झाले आहे.,

त्याअर्थी आता, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८ मुंबई ३) च्या कलम १८ ए (४), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई ५९) च्या कलम १४ (४) अन्वये तसेच राज्य निवडणूक आयोगास समर्थ करणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन राज्य निवडणूक आयोगाचे उपरोक्त दि.२१/११/२०११ व दि.०९/०२/२०१५ चे आदेश रद्द करण्यात येत आहेत. तसेच महानगरपालिका निवडणुकीसंबंधात पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

१) राज्यातील महानगरपालिकांच्या (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळून) सार्वत्रिक निवडणुकीकरिता प्रत्येकी १० ते १२ प्रभागांकरिता एक याप्रमाणे निवडणूक निर्णय अधिकारी राहतील.
२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये साधारणत: १० प्रभागांकरिता एक याप्रमाणे निवडणूक निर्णय अधिकारी राहतील.
३) महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये महापालिका आयुक्त, उपजिल्हाधिकारी पदाच्या दर्जापेक्षा कमी नाही अशा अधिका-याची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करतील. तथापि, अपवादात्मक परिस्थितीत अथवा पोट निवडणुकीसाठी महानगरपालिकेच्या कार्यालयातील तहसिलदार पदाच्या दर्जापेक्षा कमी नाही अशा दर्जाच्या अधिका-याची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करता येईल.

निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यावर महानगरपालिकेचा संबंधित अधिनियम व नियमातील तरतुदीनुसार तसेच राज्य निवडणूक आयोगाने वेळोवेळी दिलेले आदेश, सूचना, परिपत्रकातील तरतुदीनुसार निवडणुकीचे काम सुरळीतपणे पार पाडण्याची जबाबदारी राहील.

४) महानगरपालिका आयुक्त पुढे नमूद केल्याप्रमाणे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांची नियुक्ती करतील. तसेच प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी राहतील.

(अ) **सहायक निवडणूक निर्णय अधिकारी क्र.१** - हा अधिकारी तहसिलदार संवर्गातील असेल व निवडणूक निर्णय अधिका-याला अधिनियम व नियमातील तरतुदीनुसार पार पाडावयाच्या कामकाजात हा अधिकारी मदत करेल.

(ब) **सहायक निवडणूक निर्णय अधिकारी क्र.२** - हा अधिकारी महानगरपालिकेच्या कार्यालयातील तहसिलदार पदाच्या दर्जापेक्षा कमी नाही अशा दर्जाचा अन्य अधिकारी असेल. तो मतदान केंद्राची पाहणी करणे व तेथे योग्य त्या सोयी सुविधा पुरविणे, मतदान व मतमोजणी अधिकारी / कर्मचारी यांना प्रशिक्षण देणे, साहित्य वाटप, इ.बाबत आवश्यक ती कार्यवाही करेल. आचारसंहितेशी संबंधित कामकाज पार पाडण्याकरिता हा अधिकारी आचारसंहिता कक्षाबरोबर योग्य तो समन्वय साधेल.

(क) **सहायक निवडणूक निर्णय अधिकारी क्र.३** - हा अधिकारी महानगरपालिकेच्या कार्यालयातील नायब तहसिलदार पदाच्या दर्जापेक्षा कमी नाही अशा दर्जाचा अन्य अधिकारी असेल. तो निवडणूक व्यवस्थापनांतर्गत वेबसाईट अद्ययावत करणे, त्यावर वेळोवेळी उमेदवारांची प्रतिज्ञापत्रे अपलोड करणे, वृत्तपत्रांची कात्रणे व इतर माहिती अपलोड करणे, तसेच राज्य निवडणूक आयोगास विहित नमुन्यामधील माहिती वेळोवेळी सादर करणे. इ. अनुषंगिक कामे करेल.

निवडणूक निर्णय अधिका-यांच्या नियंत्रणाखालील सहायक निवडणूक निर्णय अधिकारी क्र.१ व २ हे निवडणूक निर्णय अधिका-यांची कोणतीही कर्तव्ये पार पाडू शकतील. परंतु नामनिर्देशनपत्रांची छाननी करणे याच्याशी संबंधित असलेल्या आपल्या कामांपैकी कोणतेही काम पार पाडण्यास निवडणूक निर्णय अधिकारी अनिवार्य अशा परिस्थितीमुळे असमर्थ झाला नसेल तर, कोणताही सहायक निवडणूक निर्णय अधिकारी छाननीशी संबंधित उक्त कामांपैकी कोणतेही काम पार पाडणार नाही.

५) आचारसंहिता कक्ष- महानगरपालिका आयुक्त निवडणूक आचारसंहितेशी संबंधित सर्व कामकाज हाताळण्यासाठी आचारसंहिता कक्ष स्थापन करतील. तसेच सदर कक्षाचा प्रमुख म्हणून उपजिल्हाधिकारी संवर्गातील एका अधिका-याची नियुक्ती करतील. आचारसंहितेशी संबंधित सर्व कामकाज या कक्षाकडून हाताळण्यात येईल.

६) उमेदवारांच्या निवडणूक खर्चाचा हिशोब - महानगरपालिका आयुक्त निवडणूक लढविणा-या उमेदवारांनी सादर केलेल्या निवडणूक खर्चाचा हिशोब तपासण्याकरिता एक कक्ष स्थापन करतील व या कक्षामध्ये लेखाधिकारी वर्ग-१ या संवर्गातील एका अधिका-याची कक्षप्रमुख म्हणून नियुक्ती करतील. उमेदवारांनी सादर केलेल्या दैनंदिन व एकत्रित खर्चाचे हिशोब या कक्षामार्फत तपासण्यात येतील.

७) महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी महापालिका आयुक्त यांना निवडणूक निर्णय अधिका-याची नेमणूक, सहायक निवडणूक निर्णय अधिका-याची नेमणूक, तसेच या

आदेशात नमूद केल्याप्रमाणे अन्य कामांसाठी अधिका-यांची नियुक्ती करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे ही संबंधित विभागीय आयुक्त यांची जबाबदारी राहील.

८) **नियंत्रण** - महानगरपालिका निवडणुकांच्या बाबतीत संबंधित महानगरपालिका आयुक्त हे **"निवडणूक अधिकारी"** म्हणून काम पाहतील. सर्व संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी, मतमोजणी पर्यवेक्षक, मतमोजणी सहायक तसेच निवडणुकीशी संबंधित इतर सर्व अधिकारी व कर्मचारी हे निवडणूक अधिका-यांच्या म्हणजेच महानगरपालिका आयुक्त यांच्या नियंत्रण आणि पर्यवेक्षणाखाली काम करतील.

सदर आदेश राज्य निवडणूक आयोगाच्या www.mahasec.com या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :-

१. सर्व महानगरपालिका आयुक्त
२. सर्व विभागीय आयुक्त
३. सर्व जिल्हाधिकारी
४. राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी / सर्व कार्यासने
५. मा.राज्य निवडणूक आयुक्तांचे स्वीय सहायक
६. सचिव, राज्य निवडणूक आयोग यांचे स्वीय सहायक
७. निवड नस्ती